I.O. पता.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना

**P.S.(ठाणे):** मंठा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0231

**Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/05/2023 19:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 07/12/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/12/2022

**Time From (वेळेपासून):** 14:56 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/05/2023 **Time (वेळ):** 19:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/05/2023 19:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे मंठा आवारात ,मंठा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लक्ष्मण शिवाजी मोटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शकरनगर पाटोदा ,मंठा ,मंठा ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शंकरनगर पाटोदा ,मंठा ,मंठा ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9422200575

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुर्यकांत माधवराव केंद्रे | | | 1. पोलीस ठाणे मंठा ,मंठा ,मंठा , जालना,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 25/05/2023

मी लक्ष्मण शिवाजी मोटे, वय 29 वर्ष, व्यवसाय- शेती रा.शंकरनगर, पाटोदा, ता.मंठा, जि.जालना मो.नं. 9422200575, 8482906467

मी वरील प्रमाणे असुन दिनांक 01/12/2022 रोजी समक्ष ऍन्टी करप्शन ऑफीस औरंगाबाद येथे हजर येऊन तक्रार लिहुन दिली होती की, मी व माझा मोठा भाऊ आमची गरीबी असल्यामुळे कधी कधी चोरुन देशी दारु विकतो व घर भागवतो.

मागील दिवाळीत माझ्या पत्नीला छेडछाड केल्यामुळे सुंदर घुले रा.तळतुंबा, ता.सेलू जि.परभणी याच्यावर पोलीस स्टेशन मंठा जि.जालना येथे गुन्हा दाखल केला होता. त्याचा तपास पोलीस केंद्रे साहेब यांच्याकडं होता. त्यामुळे मी त्यांना सदर गुन्हयात आरोपीला अटक करुन कोर्टात चार्जसीट दाखल केली नाही म्हणुन विचारायला दिनांक 28/11/2022 रोजी पोलीस स्टेशन मंठा येथे गेलो होतो. त्यावेळी पोलीस केंद्रे साहेब हे मला पोलीस स्टेशनमधी भेटले. त्यावेळी पोलीस केंद्रे साहेब मला बोलले की, तुझ्या बायकोच्या गुन्हयात चार्जसीट दाखल करतो त्यासाठी तुझ्याकडुन पैसे घेत नाही. परंतू गेल्या तीन महिन्यापासुन तु आणि तुझा भाऊ दारु विकताय त्याच्याकडे मी कानाडोळा केलाय पण तुम्ही त्याचा मला एक रुपया पण हप्ता दिला नाही. तुला दारुचा धंदा चालवायचा असेल तर महिन्याला 1 केस व 2,000/- रुपये हप्ता दयावा लागल व मागील तीन महिन्याची बाकी 6,000/- रुपये दिले तरच मी तुला धंदा करु देईन नाहीतर तुम्हा दोघा भावांवर केस करुन लॉकअपमधी टाकुन देईन, आणितुमची जामीन सुध्दा होऊ देणार नाही. अशी धमकी देऊन चार-पाच दिवसात मागचे पैसे दिले नाहीस तर तुझ्याकडं बघतो असा दम दिला.त्यामुळे मी घाबरुन नाईलाजाने पैशाची सोय करुन आणुन देतो असे म्हणुन तिथुन निघुन आलो आहे.

पोलीस केंद्रे साहेब यांच्यात व माझ्यात पैशाचा देण्या घेण्याचा व्यवहार नाही. वैर दुष्मनी नाही. मी व माझा भाऊ चोरुन देशी दारु विकतो त्यासाठी महिन्याला एक केस व महिन्याचा हप्ता म्हणुन 2,000/- रुपये व मागील तीन महिन्याची बाकी 6,000/- रुपये पोलीस केंद्रे साहेब यांना दयायची इच्छा नाही. वर प्रमाणे त्यांनी किंवा त्यांचे वतीने इतर कोणी माझ्याकडे पैशाची मागणी करुन ते पैसे स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे पाच सहा दिवसांनी मी पोलीस केंद्रे साहेब पोलीस स्टेशन मंठा येथे भेटायला जाणार आहे त्यावेळी कारवाई करावी हि विनंती आहे. अशी तक्रार दोन पंचासमक्ष दिली होती.

वरील प्रमाणे मी दिलेल्या तक्रारीवरुन क्षीरसागर साहेब यांना दिनांक 07/12/2022 रोजी मी माझ्या तक्रारीची पुढील कारवाई करण्यासाठी बोलविले त्याप्रमाणे क्षीरसागर साहेब हे त्यांचे टीमसह व दोन्ही पंचासह मंठा येथे दि. 07/12/2022 रोजी हजर आले त्याठिकाणी मी माझ्याकडील मोटार सायकलने हजर झालो. त्याठिकाणी क्षीरसागर साहेबांनी आम्हा सर्वांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने सुचना दिल्या व पंच क्र.1 यांना माझ्या सोबत दिले व माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पोलीस केंद्रे साहेब यांचे भेटीसाठी पो.ठाणे मंठा येथे पाठविण्यात आले. त्याप्रमाणे मी पंच क्र.1 यांचेसह पो.स्टे.मंठा येथे जाऊन पोलीस केंद्रे यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला पंचासमक्ष बोलले की, तु फोनवर बोलत नको जाऊ, असे बोलुन तुझी गावात कुणी गॅरंटी घेत नाही, गाव तुझ्या विरोधात हाय, तू हे दारुचा धंदा कशाला करतोस, तुम्हाला मराठयांना हे शोभत नाही. तुझ्याच गावातले तुझ्या विरोधात हाईत गेल्या दोन तीन महिन्यापासुन मी कानाडोळा केलाय असे म्हणुन माझ्या दारुच्या धंदया विषयी बोलुन मागील तीन महिन्यापासुन चालू हाय बघ तुझं.. असं म्हणुन महिन्याला 1 केस व मागाल तीन महिन्याचे हप्त्याची बाकी म्हणुन हाताचे बोटाने 6 बोटे दाखविले त्यावेळी मी त्यांना सहा हजार रुपये का असे विचारले असता त्यांनी हां..असे म्हणुन तीन महिने झालेना तुला असे म्हणुन आणुन दे फटदिशी असे बोलले त्यावेळी मी सहा हजार रुपयावरुन पाच हजार रुपये घेण्याची विनंती केली असता त्यांनी अं.. माझ्यापशी नको देऊ, पोलीस पाटालांपशी दे..असे सांगितले .

त्यानंतर दि.08/12/2022 रोजी पोलीस केंद्रे साहेब यांचे सांगण्याप्रमाणे आमच्या गावातील पोलीस पाटील नाना माळी यांचेकडे पोलीस केंद्रे साहेब यांनी सांगितलेली लाचेची रक्कम 5,000/- रुपयांच्या नोटांना ऍन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्याकडे दिल्या व सोबत पंच क्र.1 यांना देऊन पोलीस पाटील नाना माळी यांना देण्यासाठी पाठविले परंतू पोलीस पाटील नाना माळी हे त्यांचे घरी नसल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही. म्हणुन मी पोलीस केंद्रे.साहेब त्यांचे फोनवर फोन करुन पोलीस पाटील घरी नसल्याचे सांगितले त्यावेळी पोलीस केंद्रे साहेबांनी गाडीवरच हायरे.. मी गावात या लागलोय..गावात या लागलोय मी..असे बोलले. त्यानंतर आम्ही केंद्रे साहेबांची संध्याकाळ पर्यंत वाट पाहिली परंतू पोलीस केंद्रे साहेब गावात आले नाही व त्यानंतर माझा फोनही घेतला नाही. त्यावेळी सापळा कारवाई थांबविण्यात आली.
त्यानंतर दि.19/12/2022 रोजी पोलीस केंद्रे साहेब यांनी मला पो.ठाणे मंठा येथे बोलविल्याप्रमाणे मी गेलो त्यावेळी पोलीस केंद्रे साहेब यांनी मला दारुच्या हप्त्याच्या पैशाची विचारणा केली त्यावेळी मी त्यांना सध्या पैसे नाहीत बाजारचे दिवशी शुक्रवारी (दि.23/12/2022) रोजी पैसे घेऊन पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले. व ही घटना मी क्षीरसागर साहेबांना सांगुन शुक्रवारी दिनांक 23/12/2022 रोजी कारवाई करण्यास येण्याचे सांगितले. त्याप्रमाणे क्षीरसागर साहेब हे त्यांचे दोन्ही पंच व टीमसह मंठा येथे हजर आले. मी त्यांचेकडे पोलीस केंद्रे साहेब यांना देण्यासाठी हजर केलेले 5 हजार रुपयांच्या 500/- रु.च्या 10 नोटा पावडर लावलेल्या माझ्याकडे दिल्या व पंच क्र.1 यांना माझ्या सोबत देऊन पो.ठाणे मंठा येथे पोलीस केंद्रे साहेब यांना त्यांनी मागितलेले 5 हजार रुपये देण्यासाठी गेलो. त्यावेळी पोलीस केंद्रे साहेब यांनी मला बोलले की, तुला सांगितलंना मी तिकडं येतो..याचं नाही इकडं..त्यावेळी मी त्यांना मला दोन शब्द बोलायचय अशी विनंती करत होतो परंतू त्यांनी मला तु कांही बोलु नको जा तू..मी येतो तिथं.. तू जा इथून असे बोलुन माझ्यावर संशय घेऊन माझ्याकडील पैसे न घेता मला पोलीस स्टेशन मधुन काढुन दिले. पोलीस केंद्रे साहेब यांना माझावर संशय आल्याने त्यांनी माझ्याकडुन त्यांनी मागितलेले पैसे घेतले नाहीत. त्याबाबत मी क्षीरसागर साहेबांकडे तसा सविस्तर जबाब दिलेला आहे. त्यानंतर पोलीस केंद्रे साहेब यांचे नांव सुर्यकांत केंद्रे असुन ते ए.एस.आय. असल्याचे माहीत झाले.
तरी पो.ठाणे मंठा येथील पोलीस सुर्यकांत केंद्रे साहेब ए.एस.आय. यांनी मी व माझा मोठा भाऊ चोरुन दारुची विक्री करतो म्हणुन दिनांक 07/12/2022 रोजी पोलीस ठाणे मंठा येथे पंचासमक्ष माझ्याकडे महिन्याला दारुची एक केस व 2,000/- रुपये हप्ता म्हणुन मागील तीन महीन्याचा थकलेला हप्ता म्हणुन 6,000/- रुपयाची मागणी केली त्यावेळी मी त्यांना विनंती करुन 5,000/- रुपये घेण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी अगोदर आणुन दे फटदिशी म्हणुन स्वत: स्विकारणार होते. त्यानंतर त्यांनी अं.. माझ्यापशी नको देऊ, पोलीस पाटालांपशी दे असे म्हणुन पोलीस पाटलांकडे देण्यास सांगितले व त्यानंतर पैसे पोलीस पाटलांकडे देण्यास गेलो असता पोलीस पाटीलांची भेट झाली नाही व त्यानंतर पोलीस सुर्यकांत केंद्रे साहेब यांचेकडे पैसे देण्यासाठी गेलो असता पोलीस सुर्यकांत केंद्रे साहेब यांनी मी करत असलेल्या कारवाईवर माझ्यावर संशय आल्याने त्यांनी ठरलेली रक्कम 5,000/- रुपये स्विकारले नाहीत. तरी मी दिनांक 07/12/2022 रोजी माझ्या पत्नीकडुन दाखल गुन्हयात चार्जसीट बाबत विचारणा करण्यासाठी गेलो असता मी व माझा भाऊ चारुन दारुची विक्री करतो या कारणासाठी वरील प्रमाणे लाचेची मागणी केली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझ्या सांगणे मराठीत संगणकावर टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.
हि फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sanjay Shivajirao Deshmukh(I (Inspector)) / POBN64560

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): or (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे ...

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sanjay Shivajirao De
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN64560